boalnashik2025@gmail.com

दैनिक बोल नाशिक

प्रत्येक बातमीचा निःपक्ष खुलासा

PRGI No. MHBIL/25/-2129

शुक्रवार । दि. ६ मार्च २०२६ | वर्ष : १ ले | अंक : ७५ वा | पाने : ४ | किंमत : २ रु. | संपादक : मायकल खरात, मो.९३५९२६११९२ | कार्यकारी संपादक : देविदास बैरागी

## संक्षिप्त...



बागलाण तालुक्यात धक्कादायक घटना

### बाभूळ तोडताना ३३ केव्ही लाईनचा शॉक; पिंपळदरच्या व्यक्तीचा मृत्यू

सटाणा । तालुक्यात एक धक्कादायक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. पिंपळदर येथील चिंतामन गुमन वाघ यांचा ३३ केव्ही मेन लाईनचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना खमताणे-पिंपळदर शिवारातील शनी मंदिराजवळ घडली. मिळालेल्या माहितीनुसार, चिंतामन वाघ हे शेळ्या चारण्यासाठी शिवारात गेले होते. शेळ्यांसाठी चारा मिळावा म्हणून ते झाड तोडत होते. दरम्यान, झाडाच्या फांद्या वरून गेलेल्या ३३ केव्ही मेन विजेच्या लाईनला स्पर्श झाल्याने अचानक जोरदार विजेचा प्रवाह झाडामध्ये उतरला. त्यामुळे त्यांना तीव्र विजेचा शॉक बसला. या धक्क्यामुळे चिंतामन वाघ यांचा झाडावरच मृत्यू झाला. घटना समजताच परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत गर्दी केली. त्यानंतर वीजपुरवठा बंद करून मृतदेह खाली उतरवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या दुर्दैवी घटनेमुळे पिंपळदर व परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून वाघ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



### मन अन् मनगट बळकट करण्यासाठी महिलांना मुद्गल व्यायामाचे प्रशिक्षण

नाशिक । महिलांचे मन आणि मनगट बळकट करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांना शारीरिकदृष्ट्या सक्षम बनवणे या उद्देशाने महिलांसाठी एकदिवसीय मुद्गल प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. जागतिक महिला दिनानिमित्त छत्रपती सेना महिला आघाडी आणि मुद्गल शक्ती क्लब यांनी हे शिबिर आयोजित केले होते.

मुद्गल क्लबच्या संस्थापिका शिल्पा सोनार, प्राची देवस्थळी, वैशाली सावळे यांनी महिलांना प्रशिक्षण दिले. त्यांनी महिलांना मुद्गल व्यायामाचे प्रमुख फायदे समजावून सांगितले. मुद्गल व्यायामामुळे खांदे व भुजा मजबूत होतात, मुद्गल फिरवल्यामुळे खांदे, हात आणि मनगटातील स्नायू बळकट होतात, पकड सुधारते, जाड हँडलमुळे हाताची पकड मजबूत होते, ती इतर व्यायाम प्रकारांसाठीही फायदेशीर ठरते आणि लवचिकता, चपळता वाढते याकडे त्यांनी लक्ष वेधले.

छत्रपती सेनेच्या कोअर टीम सदस्या विद्या चव्हाण, रेखा भागवणे, ज्योती गांगुर्डे, पद्मा दरेकर यांसह महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मुद्गल व्यायाम प्रशिक्षणात सहभागी महिलांसह प्रशिक्षक. यात खांदे व सांधे अधिक लवचिक होतात. मुद्गल फिरवताना पोटाचे स्नायू सक्रिय राहतात, त्यामुळे शरीराचा समतोल सुधारतो. हा व्यायाम सांध्यांवर जास्त ताण न देता स्नायूंची ताकद वाढवतो. उत्तम कार्डिओ-स्ट्रेंथ वर्कआउट असून शरीरातील रक्ताभिसरण सुधारते.

महिलांचे मन आणि मनगट बळकट व्हावे, आत्मविश्वास वाढावा आणि कोणत्याही प्रसंगाला त्या खंबीरपणे सामोऱ्या जाव्यात हा या प्रशिक्षणाचा खरा हेतू आहे. जास्तीत जास्त महिलांनी मुद्गल व्यायाम करावा

- शिल्पा सोनार, प्रदेश अध्यक्ष, महिला आघाडी, छत्रपती सेना

# धक्कादायक! नाशिकरोडच्या स्टार प्लस मॉलच्या हॉस्पिटलमध्ये महिलेचा बळी?

## डॉक्टरांचे दुसऱ्याकडे बोट तर एक डॉक्टर पुण्यात पसार!

नाशिक । मायकल खरात



**सावधान! स्टार प्लस मॉलमधील 'त्या' हॉस्पिटलमध्ये जाण्यापूर्वी विचार करा. एका सुदृढ महिलेचा जीव घेणाऱ्या त्या डॉक्टरांना कायद्याचा झटका दाखवण्यासाठी येथे जीव गमावलेल्या पीडित कुटुंबीयांसह सामाजिक कार्यकर्ते कायद्याच्या कचाट्यात खेचण्यासाठी आता सज्ज झाले आहेत.**

एकीकडे 'डॉक्टर हा देवदूत असतो' असे म्हटले जाते, मात्र नाशिकरोड येथील स्टार प्लस मॉलमध्ये असलेल्या एका नामांकित हॉस्पिटलने या विधानाला काळीमा फासली आहे. देवळाली कॅम्प जवळील एका महिलेचा डॉक्टरांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करण्यात येत असून, या घटनेमुळे नाशिकमध्ये खळबळ उडाली आहे.

देवळाली कॅम्प जवळील एक महिला अगदी चांगल्या चालण्याच्या परिस्थितीत उपचारासाठी स्टार प्लस मॉलमधील या हॉस्पिटलमध्ये दाखल झाली होती. मात्र, डॉक्टरांनी उपचार करताना प्रचंड हलगर्जीपणा केल्याचे समोर येत आहे. योग्य वेळी लक्ष न दिल्याने आणि उपचारात कसुरी केल्याने या महिलेला आपला जीव गमवावा लागला. विशेष म्हणजे, घटनेचे गांभीर्य ओळखून यातील एक मुख्य डॉक्टर जबाबदारी झटकून थेट पुण्याला नातेवाईकांकडे पसार झाला असून, तो आपला गुन्हा दुसऱ्या डॉक्टरवर ढकलत असल्याची माहिती समोर आली आहे.

**धार्मिक विधी होऊ द्या, मगच हिसका दाखवू - कुटुंबीयांचा इशारा**

महिलेच्या मृत्यूमुळे कुटुंबीयांचा संताप अनावर झाला आहे. मात्र, सध्या कुटुंब दुःखात असल्याने त्यांनी संयम राखला आहे. महिलेचे सर्व धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर आम्ही या हॉस्पिटलचा खरा चेहरा जगासमोर आणू आणि अधिकृतपणे पोलीस केस दाखल करू, असा आक्रमक पवित्रा नातेवाईकांनी घेतला आहे.

**हॉस्पिटलचे 'काळे कारनामे' चव्हाट्यावर येणार!**

या हॉस्पिटलमध्ये यापूर्वीही अशाच प्रकारचे धक्कादायक प्रकार घडल्याची चर्चा आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने येथील कारभाराची माहिती घेतली असता, या हॉस्पिटलचे अनेक जुने कारनामे आणि मागची सर्व प्रकरणांची माहिती मिळण्यास सुरुवात झाली असून जी लवकरच पुराव्यासह जनतेसमोर सादर केली जाणार आहेत. मॉलच्या इमारतीत चालणाऱ्या या 'मृत्यूच्या फॅक्टरी'वर प्रशासन कधी कारवाई करणार, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

## खाजगीत पाच हजारांना मिळणारी एचपीव्ही लस आता नाशिक मध्ये मोफत

नाशिक । प्रतिनिधी

बदलत्या जीवनशैली, असंतुलित आहार, तणाव आणि स्वच्छतेच्या अभावामुळे हा कर्करोग महिलांमध्ये झपाट्याने वाढत असून, देशातील महिलांमध्ये होणाऱ्या कर्करोगांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी आरोग्य विभागाने पाऊले उचलण्यास सुरूवात केली. १४ ते १५ वर्ष वयोगटातील किशोरवयीन मुलींना एचपीव्ही लस आता मोफत मिळणार आहे.





एचपीव्ही लस लवकरच ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांवर मोफत उपलब्ध होणार असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आली. ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस (एचपीव्ही) हा महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण मानला जातो. हा संसर्ग लैंगिक संपर्काद्वारे होऊ शकतो. लसीकरण केल्यास शरीरात या विषाणूविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण होते आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा धोका तब्बल ९९ टक्क्यांनी कमी होतो. या कर्करोगाला प्रतिबंध घालण्यासाठी एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) ही प्रतिबंधात्मक लस जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक जिल्ह्यामध्ये मोफत दिली जाणार आहे. कर्करोगावर मात करण्यासाठी १४ वर्षे पूर्ण झालेल्या आणि १५ वा वाढदिवस साजरा न केलेल्या मुलींना ही लस मोफत दिली जाणार आहे. नाशिक जिल्ह्यातील सुमारे १०,४०० पात्र मुलींना या मोहिमेचा लाभ मिळणार आहे. नाशिक जिल्हातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, आयुष्मान भारत अंतर्गत कार्यरत आयुष्मान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालये. या ठिकाणी ही लस मोफत उपलब्ध होणार आहे. लाभार्थी मुलींची नोंदणी केंद्र सरकारच्या ण-थळप पोर्टलवर डिजिटल पद्धतीने केली जाईल. लसीकरण झालेल्या मुलींची ओळख पटवण्यासाठी त्यांच्या डाव्या हाताच्या बोटावर खूण केली जाणार आहे. हे लसीकरण पूर्णपणे ऐच्छिक असून पालकांच्या लेखी संमतीनंतरच मुलींना लस दिली जाईल. खाजगी बाजारात ३,००० ते ५,००० रुपयांपर्यंत किंमत असलेली ही लस शासनामार्फत मोफत उपलब्ध करून दिली जात आहे. पुढील तीन महिने ही मोहीम सलग राबवून त्यानंतर तिचा समावेश नियमित लसीकरण कार्यक्रमात केला जाणार आहे. ही लसीकरण मोहीम ऐच्छिक स्वरूपाची असून, पालकांच्या लेखी संमतीनंतरच मुलींना लस देण्यात येईल. कोणत्याही गैरसमजांना बळी न पडता पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे.

## मनमाड-धुळे-इंदूर रेल्वे मार्ग; तक्रारींच्या पार्श्वभूमीवर संयुक्त बैठकीची गरज : खा.शोभा बच्छाव यांची तक्रार

नाशिक । प्रतिनिधी



उत्तर महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशला थेट जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी मनमाड-धुळे-इंदूर रेल्वे मार्ग प्रकल्पाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून भूसंपादनातील अडचणी आणि शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत निर्माण झालेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर तातडीने संयुक्त बैठक बोलवावी, अशी मागणी धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले आहे.

खासदार डॉ. बच्छाव यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मनमाड-धुळे-इंदूर रेल्वे मार्ग हा उत्तर महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून या मार्गामुळे धुळे जिल्ह्यासह परिसरातील औद्योगिक, व्यापारिक तसेच प्रवासी वाहतुकीला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पामुळे धुळे, नंदुरबार तसेच सीमावर्ती भागातील नागरिकांना रेल्वे संपर्काची सुविधा उपलब्ध होणार असून प्रदेशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला गती मिळू शकते. मात्र सध्या या प्रकल्पाचे काम काही ठिकाणी थांबले असून भूसंपादन प्रक्रियेत निर्माण झालेल्या अडचणी त्यामागील प्रमुख कारण असल्याचे दिसून येत आहे. धुळे लोकसभा मतदारसंघातील विविध गावांमधील शेतकरी आणि नागरिकांकडून भूसंपादनाबाबत सातत्याने तक्रारी येत असल्याचेही खासदारांनी निवेदनात नमूद केले आहे.

जमिनीचे दर निश्चित करताना सध्याच्या बाजारभावाचा विचार न करता जुन्या दरानुसार मोबदला देण्यात येत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये नाराजी आणि असंतोष निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. भूसंपादन प्रक्रियेबाबत स्पष्ट माहिती न मिळाल्याने प्रभावित शेतकरी आणि नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता राखणे आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला देणे आवश्यक असल्याचे खासदार डॉ. बच्छाव यांनी अधोरेखित केले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांच्या दालनात रेल्वे विभागाचे अधिकारी, महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या बैठकीत भूसंपादन प्रक्रियेत निर्माण झालेल्या अडचणी, शेतकऱ्यांच्या मोबदल्याचा पुनर्विचार तसेच रखडलेले काम पुन्हा सुरू करण्याबाबत ठोस निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. मनमाड-धुळे-इंदूर रेल्वे मार्ग हा उत्तर महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प मानला जात असून या मार्गामुळे धुळे, नंदुरबार आणि परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे प्रकल्पातील अडथळे दूर करून लवकरात लवकर कामाला गती देण्याची मागणी आता विविध स्तरांतून जोर धरू लागली आहे.

# दीड वर्षांत नाशिककरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता

## नाशिक वर्तुळाकार रस्त्याच्या कामाला मार्चअखेरीस सुरुवात

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक शहरातील अंतर्गत वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी, तसेच वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यासाठी ६६.१५ किमी लांबीचा नाशिक वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. त्यानुसार या रस्त्याच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने (एमएसआयडीसी) सात टप्प्यांत निविदा मागविल्या होत्या. या निविदांना चांगला प्रतिसाद मिळाला असून नुकत्याच आर्थिक निविदा खुल्या करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सर्वात कमी बोली लावणाऱ्या निविदा निश्चित करण्यात आल्या असून आता त्या अंतिम करण्यासाठी प्रस्ताव लवकरच राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.

निविदांना मान्यता मिळाल्यानंतर मार्चअखेरीस प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याचे एमएसआयडीसीचे नियोजन आहे. कामास सुरुवात झाल्यापासून १५ ते १६ महिन्यांत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे येत्या दीड वर्षांत हा रस्ता पूर्ण होऊन नाशिककरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता होईल. तसेच कुंभमेळ्यात वाहतुकीचे सुयोग्य व्यवस्थापन करता येईल, असा दावा करण्यात येत आहे.



नाशिक शहरातील वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न सोडविण्यासह कुंभमेळ्यातील वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी राज्य सरकारने नाशिक वर्तुळाकार रस्त्याची संकल्पना मांडली. प्रारंभी या प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळावर (एमएसआरडीसी) सोपविण्यात आली होती. एमएसआरडीसीने सल्लागार 'मोनार्च' कंपनीमार्फत आराखडा तयार करून प्रक्रिया सुरू केली होती. मात्र काही महिन्यांपूर्वी हा प्रकल्प एमएसआरडीसीऐवजी एमएसआयडीसीकडे वर्ग करण्यात आला.

प्रकल्प हाती आल्यानंतर एमएसआयडीसीने सात टप्प्यांत बांधकामासाठी निविदा मागविल्या. काही दिवसांपूर्वी तांत्रिक निविदा खुल्या करण्यात आल्या आणि त्यालाही चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर आर्थिक निविदा खुल्या करण्यात आल्या. त्यानुसार टप्पा १ साठी बी. आर. भदाणे बिल्डकॉन, टप्पा २ साठी व्हीएच खत्री कन्स्ट्रक्शन प्रा. लि., टप्पा ३ साठी अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर, टप्पा ४ साठी जीएचव्ही इंडिया प्रा. लि., टप्पा ५ साठी मोंटेकार्लो लिमिटेड, टप्पा ६ साठी एसआरएम कन्स्ट्रक्टर्स लि. आणि टप्पा ७ साठी ए.एस. देसाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांच्या निविदा सर्वात कमी दराच्या ठरल्याची माहिती एमएसआयडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

या निविदा अंतिम करण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार असून लवकरच त्यास मान्यता मिळेल, अशी अपेक्षा आहे. दरम्यान, प्रकल्पासाठी निधी उभारणीसही राज्य सरकारने मान्यता दिली आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणामार्फत ३६५९.४७ कोटी रुपये निधी उभारून प्रकल्प मार्गी लावला जाणार आहे. प्रकल्पासाठी सुमारे ५० टक्के भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरित भूसंपादनही लवकरच पूर्ण केले जाणार आहे. मार्चअखेरीस कामास सुरुवात करून १५ ते १६ महिन्यांत रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे येत्या दीड वर्षांत नाशिकमधील अंतर्गत वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होईल, असा दावा एमएसआयडीसीकडून करण्यात आला आहे.

# संपादकीय...

## आत्ममग्न अध्यक्षाचे आव्हान...

एक वेळ ताटीवरील मढ्यात पुन्हा चेतना निर्माण करता येईल. पण आत्मप्रेमात मग्न-मशगुलांस वास्तवाचे भान आणून देणे अशक्य. अशांची अन्य उदाहरणे असली तरी तूर्त त्यांचे शिरोमणी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबाबत. कारण त्यांचे 'स्टेट ऑफ द युनियन ड्रेस' (एसओटीयू - सोटू). म्हणजे राष्ट्रास उद्देशून केलेले भाषण. अभिभाषणासारखी ही अमेरिकी परंपरा. नवीन वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांतील एखाद्या दिवशी अध्यक्ष कायदेमंडळाच्या संयुक्त बैठकीसमोर- म्हणजे सेनेट आणि हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज मिळून होणार्या अमेरिकी काँग्रेससमोर- भाषण करतात आणि देशाची परिस्थिती, आव्हाने, त्यावरील उपाय इत्यादी विषयांस स्पर्श करतात. या भाषणासाठी विविध मान्यवरांसही खास निमंत्रण दिले जाते.

अमेरिकी न्यायव्यवस्थेतील अधिकारी व्यक्तीही त्यास हजर असतात आणि हे भाषण संपल्यावर विरोधी पक्षनेता आपल्या पक्षाच्या वतीने भाषणावर अधिकृत प्रतिक्रिया देतो. ट्रम्प यांच्या दुसर्या खेपेतील हे महत्त्वाचे भाषण. त्याची प्रमुख कारणे तीन. एक म्हणजे गेल्या वर्षी अध्यक्षपदावर स्वार होऊन त्यांस पुरेसा वेळ मिळालेला नव्हता. दुसरे, यंदाच्या भाषणाआधीच सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्षांस दिलेला तडाखा. आणि तिसरे कारण म्हणजे अमेरिकेतील परंपरेनुसार होऊ घातलेली मध्यावधी निवडणूक. अध्यक्षांच्या चार वर्षीय कारकीर्दीच्या मध्यबिंदूवर नोव्हेंबर महिन्यातील पहिल्या सोमवारनंतरच्या मंगळवारी त्यासाठी मतदान होते. यात सेनेटमधील ४५ आणि हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज या लोकप्रतिनिधिगृहातील ४३५ जागांवर नवे प्रतिनिधी निवडले जातील. या दोन सदनांपैकी एका तरी ठिकाणी ट्रम्प यांस पराभव सहन करावा लागेल, असे म्हटले जाते. तो टाळण्यासाठी हे शेवटचे 'सोटू'. त्याचा पुरेपूर वापर ट्रम्प यांनी केला आणि आपल्या एक तास ४७ मिनिटांच्या विक्रमी भाषणात या निवडणुकीचे रणशिंगच फुंकले. त्यावर भाष्य गरजेचे. कारण या संपूर्ण भाषणात ट्रम्प यांनी आपले किती उत्तम सुरू आहे हे सांगण्यापेक्षा प्रतिस्पर्धी डेमॉक्रॅट्स हे किती नालायक आहेत यावर भर दिला. डेमोक्रॅटिक पक्षाने अमेरिकेसमोरील आर्थिक आव्हानांचा मुद्दा लोकप्रिय करण्यासाठी 'परवडण्याजोगे' (फोर्डिबिलिटी) हा परवलीचा शब्द वापरण्यास मोठ्या प्रमाणावर सुरुवात अलीकडे केली. म्हणजे अन्नधान्याचे दर, घरे, प्रवासखर्च, रोजगारनिर्मिती, थिजलेल्या वेतनश्रेणी इत्यादी कोणताही मुद्दा असो. नागरिकांस जे काही आहे ते परवडणारे आहे का, असे डेमॉक्रॅट्स विचारू लागले आहेत. त्यांस उत्तम प्रतिसाद मिळाल्याने ट्रम्प अस्वस्थ झाले आणि त्याबाबतची नाराजी त्यांच्या भाषणांतून थेट प्रक्षेपित झाली. डेमॉक्रॅट्सचे हे 'नवे खूळ' अशी संभावना ट्रम्प यांनी या शब्दप्रयोगाबाबत केली. ''डेमॉक्रॅट्सना आपली विधाने किती खोटी, प्रचारकी आणि घाणेरडी आहेत हे माहीत आहे, म्हणून ते ज्यात त्यात 'फोर्डिबिलिटी'चा मुद्दा आणून नागरिकांना भ्रमित करू पाहतात'', असा ट्रम्प यांच्या म्हणण्याचा सूर. तो लावल्यामुळे आपण उलट डेमॉक्रॅट्सचे प्रचारतंत्र यशस्वी होत असल्याचे सूचित करत आहोत, हे अध्यक्ष महाशयांच्या लक्षात आले नाही. त्यानंतरही ट्रम्प यांनी आर्थिक मुद्द्यास डेमॉक्रॅट्सच्या स्थलांतर-प्रेमाशी वारंवार जोडले. आगामी निवडणुकांआधी हा स्थलांतरितांचा मुद्दा जितका जमेल तितका तापवावा हा त्यांचा उद्देश. त्यात गैर काही नाही. फक्त स्थळ तितके योग्य नव्हते इतकेच. गेल्या काही आठवड्यांत ट्रम्प यांची लोकप्रियता लक्षणीयरीत्या घसरली असून साधारण फक्त ३०-३२ टक्के अमेरिकन ट्रम्प यांचे बरे चालले आहे या मताचे उरले आहेत. त्या पार्श्वभूमीवर काही महत्त्वाचे आर्थिक ध्येयधोरण ट्रम्प मांडतील ही अपेक्षा होती. ती फोल ठरली. त्यापेक्षा विरोधक किती वाईट आहेत हे सांगण्यावर त्यांनी भर दिला. ट्रम्प हे दूरचित्रवाणीवरचे कलाकार. त्यामुळे 'टीआरपी'चे महत्त्व ते जाणतात. त्याचे प्रत्यंतर यंदाच्या 'सोटू' भाषणात दिसले. भाषणात मजकूर काही नसला की वक्ता मनोरंजनास प्राधान्य देतो. ट्रम्प यांनी आज ते केले. बर्फावरील हॉकी स्पर्धेत विजेत्या संघातील खेळाडूंस त्यांनी अत्यंत नाट्यपूर्णपणे या समारंभात पेश केले आणि आपल्या धोरणांमुळे हे विजेतेपद अमेरिकेस मिळाल्याची बढाई ध्वनित केली. ती हास्यास्पद होती. जेव्हा एखाद्या सरकारप्रमुखाला खेळाडूंस ओढून ओढून जवळ घेण्याची, मिठीत घेण्याची गरज वाटते तेव्हा ती महत्त्वाच्या मुद्द्यांवर आपणास काही फारसे जमत नसल्याची कबुली असते. ट्रम्प यांनी 'सोटू' भाषणात ती मुबलक दिली. काही लष्करी अधिकारीही त्यांनी या भाषणासाठी पाचारण करून ठेवले होते. त्यांना तसेच बर्फावरच्या हॉकी संघाच्या कर्णधारास विशेष नागरी सन्मान त्यांनी जाहीर केले. कहर म्हणजे ट्रम्प या लष्करी अधिकार्याच्या जखमांचे रसभरित वर्णन करत बसले. हेतू हा की थेट प्रक्षेपित होणार्या या भाषणातून लष्करी अधिकार्याच्या वेदनांमुळे का असेना नागरिकांत राष्ट्रवादाची भावना चेतावी. किती अमेरिकन्स यामुळे भारले गेले हे कळण्यास मार्ग नाही. पण अध्यक्षांचा हा प्रयत्न अगदीच हास्यास्पद ठरला. त्यातल्या त्यात अध्यक्षांचा शहाणपणा म्हणजे समोर बसलेल्या न्यायाधीशांची बेअदबी होईल असे काही ते बोलले नाहीत. आयातशुल्काच्या विरोधात ट्रम्प यांच्या विरोधात निकाल देणारे न्यायाधीश या भाषणासाठी सदनात होते. या निकालावर त्वरित भाष्य करताना ट्रम्प यांनी न्यायाधीशांची संभावना 'मांडीवरचे कुत्रे', 'देशद्रोही' वगैरे शब्दांत केली होती. आज त्या मानाने त्यांनी आपल्या रसवंतीस आवर घातला. निकालावर बोलताना त्यांनी फक्त नाराजी व्यक्त केली. न्यायाधीशांबाबत सांभाळून बोलावे लागल्याने त्यांनी सभ्यतेची ती भरपाई डेमॉक्रॅट्सवर आगपाखड करून केली. अशा भाषणांतील काही महत्त्वाच्या मुद्द्यांसाठी वक्त्यास उभे राहून मानवंदना (स्टँडिंग ओव्हेशन) देण्याची पद्धत अनेक पाश्चात्त्य देशांत आढळते. ही मानवंदना उत्स्फूर्त नसेल तर अगदीच केविलवाणी ठरते. ट्रम्प यांच्या रिपब्लिकनांनी आज हा प्रकार अनेकदा केला. तथापि डेमॉक्रॅट्स मात्र बसून होते. ट्रम्प यांचा आगाऊपणा असा की त्यांनी डेमॉक्रॅट्सनाही अशी मानवंदना देण्याची सूचना केली. ती अर्थातच त्यांनी ऐकली नाही. त्यावर ट्रम्प यांनी हे डेमॉक्रॅट्स किती दुष्ट आहेत वगैरे चर्हाट लावले. ते अगदी बालिश दिसले. भाषणात ट्रम्प यांनी डेमॉक्रॅट्सच्या राज्यांतील भ्रष्टाचाराची उदाहरणे दिली. मात्र त्याच वेळी स्वपक्षीय राज्ये आणि खुद्द स्वत:ची राजवट याबाबत भाष्य करणे टाळले. सार्या जगास ग्रासलेल्या एपस्टीन प्रकरणाचा उल्लेखही त्यांच्या भाषणात नव्हता. अमेरिकेत लगेच या भाषणाच्या शास्त्रोक्त विच्छेदनाची प्रथा आहे. सीएनएन, बीबीसी, न्यूयॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्ट आदी माध्यमांनी हा उद्योग अत्यंत निर्भयतेने केला. ट्रम्प यांनी किती मुद्द्यांवर आपल्या भाषणात 'फेकाफेकी' केली याचे तपशील लगोलग या माध्यमांतून प्रसृत केले गेले. ट्रम्प म्हणाले काय आणि वास्तव काय याचे 'हा सूर्य, हा जयद्रथ' असे माध्यम- सादरीकरण ही तेथील लोकशाहीच्या जिवंतपणाची साक्षच. या भाषणानंतर डेमोक्रॅटिक पक्षाच्या नवनिर्वाचित नेत्या, व्हर्जिनियाच्या गव्हर्नर (मुख्यमंत्री) बिगेल स्पॅनबर्गर यांनी नागरिकांस फक्त तीन प्रश्न विचारले : अध्यक्ष ट्रम्प यांच्यामुळे तुमचे जगणे अधिक सुखी झाले आहे का? तुम्ही अधिक सुरक्षितता अनुभवत आहात का? आणि हा अध्यक्ष आपल्यासाठी काम करतो असे तुम्हांस वाटते का? कोणत्याही खर्या लोकशाहीत सत्ताधार्यांविषयी या तीनही प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच येतील. पण ट्रम्प यांना याची फिकीर नाही. आपल्यामुळे अमेरिका किती महान होऊ झाली आहे, या आभासात ते मग्न आहेत. ती तशी आहे किंवा काय याचे उत्तर नोव्हेंबरात मिळेल. पण तोवर तरी रिपब्लिकनांतील मोजके शहाणे आणि अन्यांस या आत्ममग्न अध्यक्षाचे आव्हान झेलावे लागेल.

# जिल्ह्यात अवैध दारूचा बक्कळ धंदा उत्पादन शुल्क विभाग स्वयं अंधा

**नाशिक | प्रतिनिधी**


जिल्ह्यातील ग्रामीण भागात बेकायदा दारू, गावठी दारूचे अड्डे, राष्ट्रीय तसेच राज्यमार्गालगत हॉटेल आणि ढाब्यावर बेकायदा देशी विदेशी दारूचा साठा आणि त्याची खुलेआम होत असलेली विक्री यावर कारवाई होताना दिसत नाही. ग्रामीण पोलीसांनी मागील काही दिवसांत बेकायदा दारू अड्ड्यावर छापा टाकून मोठी कारवाई केली तर अनेकांवर गुन्हे दाखल करून जेलची हवा खायला लावली आहे.

असे असताना ज्यांच्याकडे बेकायदा दारू व विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याची जबाबदारी दिली आहे ते राज्य उत्पादन शुल्क विभाग झोपले आहे काय ते नेमके करतंय काय असा प्रश्न सर्वसामान्य नागरीकांना पडला आहे बेकायदा दारू तयार केली जाते आणि त्यांची विक्री केली जाते याची बहुतेक कल्पना नसावी असे होऊ शकत नाही. ग्रामीण पोलीसांनी मात्र पोलीस स्टेशनच्या हद्दीत मागील काही दिवसांपासून बेकायदा गावठी दारू अड्ड्यावर छापा टाकून दारू तयार करणाऱ्या भट्ट्या उध्वस्त करून कारवाई करण्याचा सपाटा लावला आहे या कारवाईत अनेक दारू आणि मालकांवर गुन्हे दाखल करून जेलची हवा दाखवली आहे हॉटेल आणि ढाब्यावर देशी विदेशी दारूचा बेकायदा साठा आढळून आला आहे

### कायम अंधकार पसरलेला

कारवाईचे काही काळ चित्र रंगविले जाते त्यानंतर काही दिवस दारू बंद होते परत येरे माझ्या मागल्या अशी स्थिती असते कठोर कारवाई नसल्याने अशी परिस्थिती आहे संबधित विभागाकडून केलेल्या कारवाईत बऱ्याच वेळा मिटवा मिटवीचे प्रकार जादा असतात कारवाईची माहितीही माध्यमाना दिली जात नाही दारू अडे उध्वस्त केले ऐवढेच कळते परंतू कोणाला अटक करून कारवाई केल्याचे ऐकीवात नाही परिणामी अशा दारूने, दारू काढणाऱ्या बरोबरच अनेक ग्राहक कुंटुबात पण कायम अंधकार परसरलेला असतो.

स्थानिक ग्रामिण पोलीसांकडून जिल्ह्याभरात ही कारवाई केली जात असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाचे संबंधित अधिकारी नेमके करतात तरी काय असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे मात्र तरीही स्थानिक ग्रामिण पोलीस नागरीकांच्या तक्रारीची दखल घेवून त्वरीत कारवाई करीत आहे कोणत्या गावात आणि कोणत्या ठिकाणी गावठी दारू तयार केली जात ती कोण करतंय याची सर्व कल्पना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती आहे. मात्र त्यांच्याकडून कारवाई केली जात नाही. एखादी दुसरी कारवाई करायची, ती फक्त कागदोपत्री



आणि दाखवण्यापुरतीच ठोस कारवाई का केली जात नाही तर कदाचित या व्यावसायिकांचे आर्थिक हितसंबंध असू शकतात तशी चर्चा ही जिल्ह्याभरात सुरु आहे.

उत्पादन शुल्क विभागाची जाणीवपूर्वक डोळेझाक

शासनाने राज्य उत्पादन शुल्क आणि अन्न औषध प्रशासन सारखे स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आले मात्र, या विभागाकडून कारवाईच्या नावावर केवळ कागदी घोडे नाचवले जात असल्याचे समोर आहेत येऊ लागले आहे. या विभागांचा नागरिकांशी थेट संपर्क नसल्याने त्यांच्या नावाची ओरडही पोलिसांच्या तुलनेत कमी होते असे असले तरीही शहरात व ग्रामीण भागात अवैध मद्य आणि अमली पदार्थांची तस्करी होऊ न देण्याची सर्वस्वी जबादारी राज्य उत्पादन शुल्क आणि अन्न औषध प्रशासन यांचीच आहे. त्यामुळे हे विभाग नेमके करतात तरी काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# लाईनमन हे महावितरणचे फ्रंट लाईन वर्कर, लाईनमनच्या कार्याचा नाशिकमध्ये असाही गौरव

**नाशिक | प्रतिनिधी**

महावितरणच्या ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा देण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेले जनमित्र (लाईनमन) यांचा चार मार्च हा कृतज्ञता दिन. यानिमित्त नाशिक शहर विभाग १ आणि २ मधील जनमित्रांच्या कार्याचा गौरव जेलरोड येथील मंजुळा मंगल कार्यालयात करण्यात आला. नाशिक परिमंडळाच्या पायाभूत आराखडा मंडळाचे अधीक्षक अभियंता देवेंद्र सायनेकर यांनी यावेळी, महावितरण आणि ग्राहक यांच्यातील महत्त्वाचा दुवा लाईनमन असून ते महावितरणचा चेहरासुद्धा आहेत, असे सांगितले.

सामान्य ग्राहकांचा संपर्क सर्वात आधी महावितरणच्या लाईनमन यांच्याशी येतो. त्यांच्या अखंडित तत्पर व नम्र सेवेमुळेच महावितरणची प्रतिमा निर्माण होते. त्यामुळे महावितरणचे आणखी प्रतिमा उजळण्यासाठी त्यांनी तत्पर राहून ग्राहक सेवा द्यावी. तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे, असे देवेंद्र सायनेकर यांनी सांगितले.

या प्रसंगी व्यासपीठावर महावितरणच्या नाशिक मंडळाचे अधीक्षक अभियंता राजेश थूल आणि सहायक महाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे उपस्थित होते. अधीक्षक अभियंता राजेश थूल म्हणाले की, जनमित्र हे महावितरणचे 'फ्रंट लाईन वर्कर' असून



त्यांच्या कामामुळेच जनमानसात कंपनीची सकारात्मक प्रतिमा निर्माण होते. त्यामुळे काम करताना ताणतणाव मुक्त राहून 'अपघात विरहीत सेवा' देण्यावर सर्वांनी भर द्यावा., असे आवाहन त्यांनी केले.

सहायक महाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे यांनी मार्गदर्शक सूचना देताना सांगितले की, ग्राहकांच्या घरातील अंधार दूर करण्यासाठी तुम्ही अविरत कार्यरत असतात तुमच्या या असीम कष्टामुळेच आज ग्राहकांना दर्जेदार सेवा मिळत आहे. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याने आपल्या खाकी गणवेशाचा अभिमान बाळगून तो कर्तव्यावर असताना नेहमी परिधान करावा, असे आवाहन केले.

प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राचे उपकार्यकारी अभियंता चिदानंद फाळके यांनी यावेळी उपस्थित तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी 'ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन केले. जनसंपर्क अधिकारी विकास आढे यांनी उपस्थितांना विद्युत सुरक्षेची शपथ दिली. या कार्यक्रमात प्रातिनिधीक स्वरूपात जनमित्र राहुल पराळे आणि सचिन चकोर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी विकास आढे यांनी केले. सूत्रसंचालन अतुल आगळे यांनी केले.

आभार मुख्य लिपिक सतीश पाटील यांनी मानले. या सोहळ्याला नाशिक परिमंडळातील विविध विभागांचे अभियंता, अधिकारी आणि जनमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. नाशिक शहरासोबतच परिमंडळातील सर्व विभागीय व उपविभागीय कार्यालयांमध्येही हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.


# भनवड ते बोरवण रस्त्याची झाली दैना

## प्रशासन गांभीऱ्याने लक्षच देईना

**बा-हे | प्रतिनिधी**


दिंडोरी तालुक्यातील अतिदुर्गम भागातील भनवड ते बोरवण या रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली असून प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी या गोष्टीकडे लक्ष देत नसल्याने नागरिकांना व वाहन धारकांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

दिंडोरी, सुरगाणा व पेठ या तालुक्यांना जोडण्यासाठी चिकाडी - मोखनळ - बोरवण - भनवड असा रस्ता असून भनवड ते बोरवण



दरम्यान साधारण चार ते पाच किलोमीटरचा तीव्र उताराचा घाट आहे.

या घाटा मध्ये दीड-दोन वर्षांपासून सदर रस्त्याची चाळण झाल्याने वाहनधारकांना वाहन चालविणे कठीण झाले आहे. रस्त्यात ठिकठिकाणी मोठ - मोठाले खड्डे पडल्याने अनेक वाहनांचे मोठे नुकसान होऊन ते नादुरुस्त होत आहेत. तसेच या ठिकाणी रोज लहान - मोठे अपघात देखील घडत आहेत.



भनवड - बोरवण रस्त्याची मोठी दूरवस्था झाली आहे. त्यामुळे रस्त्याचे काम हे तातडीने पूर्ण करावे. सात किलोमीटर रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून या रस्त्यावरून वाहतुकीची साधने नेणे-आणणे अवघड होत आहे.

– पंडित चौरे, वाहचालक

या भागात घनदाट जंगल असून त्या ठिकाणी दिवसा - ढवळया बिबट्याचे दर्शन होत असते, याठिकाणी रस्ता खूप खराब असल्यामुळे वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असतो, येणाऱ्या काळात सदर रस्त्यावर एखादा भयानक अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासन लोकांचा जीव जाण्याची वाट पाहत आहे का? असा सवाल नागरिक करीत आहेत. सदर रस्ता हा दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असून या गोष्टीकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी वर्गाने लक्ष देण्याची मागणी जनतेच्या वतीने करण्यात येत आहे सदर रस्त्याची डागडुजी करून त्यावर नवीन काँक्रीटिकरण अथवा डांबरीकरण व्हावे अशी मागणी परिसरातील नागरिक व वाहनधारक यांच्याकडून करण्यात येत आहे.

# डॉक्टर की एजंट? बदलापूर स्त्रीबीज विक्री प्रकरणात नाशिकचा डॉक्टर अमोल पाटील अटकेत, ते सेंटरही सील

**नाशिक | प्रतिनिधी**


बदलापूर स्त्री बीज विक्री प्रकरणाचे धागेदोरे नाशिकपर्यंत पोहोचल्याचे पोलीस तपासात आधीच समोर आले होते. आता याच प्रकरणी नाशिकमधील मालती आयव्हीएफ सेंटरचा संचालक असलेल्या डॉ. अमोल पाटील याला बदलापूर पोलिसांनी अटक केली आहे. मंगळवारी रात्री उशिरा अमोल अतुलला अटक करण्यात आली आहे. त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

डॉ. अमोल पाटीलवर सरोगेट मदर एजंट म्हणून काम केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचे अजून काही सूत्रधार समोर येण्याची शक्यता आहे. बदलापूरात स्त्री बीजाच्या अवैध विक्रीचं रॅकेट उघड झालं आहे.

याप्रकारचे हे भीषण रॅकेट चक्क एका घरातून चालवले जात होतो. सुलक्षणा गाडेकर या महिलेला घरामध्ये स्त्री बीज वाढवणारी इंजेक्शन्स बेकायदेशीरपणे साठवून ठेवली होती असा आरोप आहे. पुढे गरजू महिलांना पैशांचं आमिष दाखवून हे इंजेक्शन दिले जात होते. त्यानंतर गर्भाशयात स्त्री बीजांची वाढ झाल्यावर संबंधित महिलांना आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवल जात असे. तिथल्या डॉक्टरांकडून ऑपरेशन थिएटरमध्ये स्त्री बीज काढून त्यांची बेकायदेशीर विक्री केली जात होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.

बदलापूर उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योत्स्ना सावंत यांच्या पथकाने सुलक्षणा गाडेकर यांच्या घरी धाड टाकून हे रॅकेट उघडकीस आणले. या प्रकरणी गाडेकर यांच्यासह अश्विनी चाबुकस्वार आणि मंजुषा वानखडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे एक मोठं इंटरनॅशनल रॅकेट असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये असलेले मालती आय. व्ही. एफ सेंटरचे व्यवस्थापक यांच्यावर बदलापूर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल झालेली आहे.




त्यानुसार मालती आय. व्ही. एफ सेंटर पाचवा मजला बेला विस्टा इमारत भुजबळ फार्म जवळ येथे मनपाच्या वैद्यकीय पथकाने धाड टाकून उपलब्ध असलेले दस्तऐवज ताब्यात घेतलेले आहेत. यामध्ये मालती आय. व्ही. एफ सेंटरला सार्वजनिक आरोग्य विभाग नाशिक मनपा यांनी सोनोग्राफी केंद्र, एआरटी लेवल टू, एआरटी बँक व सरोगसी क्लिनिक याकरिता नोंदणी प्रमाणपत्र २०२५ मध्ये नियमानुसार दिलेले होते.

आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या सूचनेनुसार मनपा आयुक्त मनीषा खत्री व अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांचे मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभाग नाशिक मनपा यांचे वैद्यकीय पथकाने बुधवारी केंद्राची नोंदणी रद्द करण्यात आली व केंद्र सील करण्यात आलेले आहे.

या ठिकाणाहून ताब्यात घेतलेल्या दस्तऐवज यांची सखोल तपासणी करणे कामी चौकशी समिती नेमण्यात आलेली असून चौकशी अहवाल आल्यानंतर नाशिकच्या सेंटरमध्ये सुद्धा नियमाचे उल्लंघन होत आहे किंवा कसे हे स्पष्ट होईल असे वैद्यकिय अधिकारी डॉ. विजय देवकर यांनी स्पष्ट केले.

दैनिक बोल नाशिक
प्रत्येक बातमीचा निःपक्ष खुलासा

प्रकाशक व मुद्रक कल्पेश मधुकर बिरारी यांनी मालक श्री. प्रशांत सुभाष हिरे यांच्या वतीने हे पत्र कुलश्री प्रिंटर्स १, श्रीकुल अपार्टमेंट, गंगापूर रोड, पंपिंग स्टेशन, नासिक(महाराष्ट्र) ४२२०१३ येथे मुद्रित व ७८६, सुजाता बंगला, इंगळे नगर, जेलरोड, नाशिकरोड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी मालक, संपादक, प्रकाशक अगर मुद्रक सहमत असतीलच असे नाही. मालक श्री. प्रशांत सुभाष हिरे व श्री. मायकल खरात संपादक (महाराष्ट्र) (पी.आर.बी. कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार) मो.नं. ९३५९२६११९२ / ९१४५११०४४३, सर्व अधिकार सुरक्षित. PRGI No. MHBIL/25/-2129. Email- boalnashik2025@gmail.com

# धाऊर ग्रामस्थांचे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांविरोधात गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

दिंडोरी | प्रतिनिधी

दिंडोरी तालुक्यातील धाऊर येथील ग्रामपांयत अधिकार्यांनी गावाला विश्वासात न घेता परस्पर खडी केशरसाठी परवानगी दिली. त्यामुळे होणार्या गावाचा नुकसानीला संबंधित ग्रामपंचायत अधिकार्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी धाऊरच्या ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, चाचडगाव ते धाऊर रस्ता डांबरीकरण असून दळणवळणाचा हा एकच रस्ता आहे. तो रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरण व्हावा, अशी मागणी ग्रामस्थांची आहे परंतु सदर ग्रामपंचायत अधिकारी पी. बी. चव्हाण यांनी सदर एनओसीमध्ये सांगितले की, या रस्त्यावर मुरूम टाकून डागडुगीचे काम करण्यात येईल व त्या रस्त्यावरुन १०० ते १५० विद्यार्थी रोज पायी ये -जा करत असतात. तरी या कंट्रक्शनच्या वाहने भरधाव वेगाने ये - जा करत असतात. त्यामुळे शाळेत विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. प्रदूषण व सांडपाणी यामुळे शेती व्यवसायाला या पाण्यामुळे शेती होत नाही.

वेळोवेळी तक्रार करूनही यावर काही उपायोजना केल्या जात नाही. सदर नोटीसचा ठरावाला सर्व गावकर्यांचा विरोध होता, तरीही त्या क्रशरचा ठराव ग्रामस्थांना विश्वासात न घेता बोगसरीत्या मंजूर करण्यात आला. ग्रामसभेच्या अजंठावरती हा विषय नसताना देखील हा सर्व प्रकार करण्यात आला आहे. सदर खडीक्रेशर पासून आम्हाला गावासाठी धोका असल्याने आणि या खडीक्रशरपासून गावाचा कुठल्याही विकास कामाचा आराखडा नसल्याने सदर खडीक्रेशर बंद करण्यात यावा, ग्रामपंचायत अधिकारी सर्वच गोष्टीला जबाबदार आहे ते कुठल्याही ग्रामसभेला उपस्थित नसताना त्यांनी या खडीक्रेशर परवानगी कशी दिली. हा मोठा प्रश्न पडला आहे. तरी ग्रामपंचायत अधिकार्यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. खडीक्रेशर उभारणी करत असताना संबंधित ग्रामपंचायतच्या ग्रामसभेवर ग्रामस्थांना सोबत प्रत्यक्षात चर्चा विनिमय करून ठरावात संमत करण्यात यावा, ग्रामपंचायत अधिकारी पी. बी. चव्हाण यांनी संबंधित व्यक्तीबरोबर संलग्न करून गावाला विश्वासात न घेता ग्रामसभेत ठराव संमत न करता परस्पर परवानगी देऊन गावची दिशाभूल केली आहे. तरी संबंधित ग्रामसेवकावर कायदेशीर कारवाई करून ती परवानगी रद्द करूत नव्याने ग्रामसभेवर विषय घेऊन ग्रामसभेत चर्चा विनिमय करून सर्व ग्रामस्थांच्या परवानगी मिळत नाही तोपर्यंत खडीक्रेशर बंद ठेवावे, अन्यथा गटविकास अधिकारी कार्यालयामध्ये आम्हाला न्याय मिळेल पर्यंत आम्ही आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा धाऊरच्या ग्रामस्थांनी दिला आहे. याप्रसंगी वसंत पताडे, राकेश चौधरी, योगेश पताडे, हरीभाऊ पताडे, गणेश पताडे, दिपक पताडे, निवृत्ती पताडे, भास्कर पताडे, अरुण पताडे, बाळू पताडे, आनंदा पताडे, गोटीराम पताडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# नाशिकहून पुणे, जळगाव, धुळ्याचा बस प्रवास करा आरामदायी... अत्याधुनिक 'शिवनेरी' ची सेवा मिळणार!

नाशिक | प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना अधिक आरामदायक प्रवास सेवा मिळावी, यासाठी काही निर्णय घेतले आहेत. महामंडळाची आरामदायक बससेवा म्हणून 'शिवनेरी' ची ओळख आहे. २००२ मध्ये सुरू झालेल्या शिवनेरी बससेवेने वक्तशीरपणा, उत्कृष्ट आसनव्यवस्था आणि सुरक्षित प्रवास या गुणवैशिष्ट्यांमुळे उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांचा विश्वास जिंकला. इतर बससेवेपेक्षा तिकीट दर काहीसे अधिक असूनही तिच्या उत्तम सेवेमुळे प्रवाशांकडून शिवनेरी बससेवेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे शिवनेरी बससेवा प्रारंभापासून नफ्यात असल्याचे परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनीच सांगितले आहे.



या बससेवेचा लाभ आता नाशिक, जळगाव, धुळे येथील प्रवाशांनाही मिळणार आहे. एसटीच्या अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित 'शिवनेरी' बससेवेचा लाभ आतापर्यंत मुंबई-पुणे मार्गावरील प्रवाशांनाच घेता येत आहे. परंतु, आता या बससेवेचा लाभ महाराष्ट्रातील प्रमुख शहरांनाही होणार आहे. त्यासाठी २०० नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त व्होल्व्हो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया महामंडळाने सुरु केली आहे. या बसेस राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात दाखल होताच मुंबई-पुणेप्रमाणेच इतर महत्त्वाच्या शहरांदरम्यानही शिवनेरी सेवा सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. नवीन २०० बसेसमध्ये ३० शयनयान (स्लिपर) बसेसचा समावेश असेल. सध्या ज्या मार्गावर विना-वातानुकूलित शयनयान बससेवा आहे, त्या ठिकाणी 'स्लिपर शिवनेरी' सुरू करून प्रवासी सेवेला अधिक उन्नत रूप दिले जाणार आहे.

आरामदायी बेड-कोच सुविधा, सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे दीर्घ पल्ल्याच्या प्रवासात प्रवाशांना नव्या अनुभवाची हमी मिळणार आहे. नाशिकहून पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे या शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांनाही लवकरच शिवनेरी बससेवेचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे नाशिकहून पुणे असा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सामोरे जाणाऱ्या अडचणी दूर होण्याची शक्यता आहे.

रस्त्यातच बस बंद पडण्याचे प्रकार नाशिक-पुणे मार्गावर कायम होत असतात. अत्याधुनिक शिवनेरी बससेवा सुरु झाल्यावर त्यापासून प्रवाशांची मुक्तता होईल. महिला प्रवाशांना तसेच ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना अत्याधुनिक शिवनेरी बससेवेच्या तिकीट दरात ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना शिवनेरी प्रवास पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे नव्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांना आहे. नवीन शिवनेरी बससेवा उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांसाठी आरामदायक प्रवासाचा अनुभव देणारी ठरण्याची शक्यता आहे.

# मोसम व गिरणा नद्यांच्या पर्यावरणावर डॉ. तृप्ती काकुळते-सोनवणे यांची पीएचडी

## सटाण्याचा शैक्षणिक मान अधिक उंचावला

सटाणा | प्रतिनिधी



येथील कर्मवीर आबासाहेब तथा ना.म. सोनवणे महाविद्यालयातील प्रा.डॉ.तृप्ती काकुळते-सोनवणे यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत प्राणीशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी संपादन केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून त्यांनी ही पदवी मिळवली असून त्यांच्या संशोधनामुळे सटाणा परिसरासह संपूर्ण नाशिक जिल्ह्याचा शैक्षणिक गौरव वाढला आहे. प्रा.डॉ. काकुळते-सोनवणे यांनी शेतातील रासायनिक खतांचा नद्यांच्या पाण्यावर होणारा परिणाम आणि त्यातील जलचर विविधतेवर होणारे बदल या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांनी नाशिक जिल्ह्यातील मोसम व गिरणा या दोन प्रमुख नद्यांच्या पर्यावरणाचा सखोल अभ्यास करून शेतीतील रासायनिक खतांमुळे नदीपात्रातील पाण्याच्या गुणवत्तेत होणारे बदल आणि त्याचा जलचरांच्या जैवविविधतेवर होणारा परिणाम याचे वैज्ञानिक विश्लेषण केले आहे. त्यांच्या संशोधनातून नदी परिसंस्थेतील सूक्ष्म जलचरांच्या संख्यात्मक व गुणात्मक बदलांचा महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आला आहे. ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या एका महिला संशोधिकेने स्थानिक नद्यांच्या पर्यावरणावर केलेले हे अभ्यासपूर्ण संशोधन इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. पर्यावरण संवर्धन आणि जलस्त्रोतांच्या संरक्षणाच्या दृष्टीनेही हा प्रबंध मार्गदर्शक ठरणार असल्याचे मत शिक्षणक्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केले.

या यशाबद्दल मविप्र संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, संचालिका शालनताई सोनवणे, प्राचार्य डॉ. विजय मेधने, डॉ.नरेंद्र निकम, प्रा. राहुल सोनवणे यांनी अभिनंदन केले आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र भवरे, के.टी. एच. महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागप्रमुख व मार्गदर्शक प्रा. डॉ.विक्रम काकुळते यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. तृप्ती काकुळते-सोनवणे यांच्या या यशामुळे सटाणा शहराच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीस सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

#Viral #फीवर

''केंद्रातील भाजप सरकारच्या कटामुळे, आमच्या मतुआ बंधू आणि भगिनींना नागरिकत्व मिळण्यात चालढकल होत आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे. आम्ही बंगालच्या लोकांचे कोणतेही नुकसान होऊ देणार नाही.''

– ममता बॅनर्जी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री

# चमच्याने भिंत कापण्याचा विचित्र ट्रेंड होताहेत व्हायरल

अजब-गजब

सोशल मीडियावर कंटेंटच किंग असल्याचे म्हटले जाते. जितका चांगला कंटेंट तितके व्ह्यूज, परंतु प्रत्येकवेळी ही बाब सत्य ठरत नाही. अनेकदा अत्यंत साधारण आणि अजब दिसणारे व्हिडिओ देखील दशलक्ष व्ह्यूज प्राप्त करतात. सध्या एक असाच ट्रेंड व्हायरल होत असून याला लोक व्हायरल स्पून चॅलेंज ठरवत आहेत. या ट्रेंडची संकल्पना अत्यंत साधी आहे. क्रिएटर कॅमेऱ्यासमोर भिंतीवर चमच्याने वार करतात आणि जितके फॉलोअर्स असतील तितक्याचवेळा चमच्याने भिंतीवर स्क्रॅच करणार असल्याचे सांगतात. हा प्रकार प्रत्येक दिनी चालतो, फॉलोअर्सची संख्या वाढण्यासोबत भिंतीवर स्क्रॅचची संख्याही वाढत जाते. अनेक व्हिडिओची सुरवात 'डे वन'द्वारे होते. आज चमच्याने भिंत कापण्याचा पहिला दिवस असे क्रिटएर म्हणतो. एक फॉलोअर असेल तर एक स्क्रॅच मारतो. दुसऱ्या दिवशी दोन फॉलोअर्स झाल्यास दोन स्क्रॅच. अशाप्रकारे व्हिडिओला दररोज अपडेट केले जाते. काही क्रिएटर थट्टेच्या सुरात तुम्ही फॉलो करू नका, नाही तर माझी आई मला मारेल, असे म्हणतात. हा ट्रेंड आता केवळ भिंतीपुरती मर्यादित राहिलेला नाही. काही व्हिडिओंमध्ये क्रिएटर आज चमच्याने नदी खाली करण्याचा डे वन असल्याचे म्हणत असल्याचे दिसून येते. एक फॉलोअर असेलतर एक चमचा पाणी बाहेर काढू, उद्या जितके फॉलोअर्स वाढतील, तितके चमचे पाणी काढू. अशाप्रकारे फॉलोअर्सची संख्या थेट पुनरावृत्ती होणाऱ्या कामाशी जोडण्यात येत आहे. असे साधारण व्हिडिओही लाखो-कोट्यावधी व्ह्यूज मिळवत आहेत. याकरता मोठ्या एडिटिंगची गरज नाही, तसेच चेहरा दाखविण्याची गरज नाही. केवळ एक चमचा आणि दररोजची गणना आवश्यक आहे. सोशल मीडियाच्या जगतात काय व्हायरल होईल याचा अंदाज लावणे अवघड आहे. सध्या चमच्याने भिंतीवर पडणारे स्क्रॅच लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत.



# मंगळावर अजस्त्र 'कोळिष्टक'!

SCIENCE FACTS

'नासा'च्या क्युरिऑसिटी रोव्हरने मंगळ ग्रहाच्या पृष्ठभागावर पसरलेल्या एका विशाल 'कोळिष्टका'सारख्या संरचनेचे चित्तवेधक फोटो काढले आहेत. यातील एका फोटोमध्ये अंड्यासारखे गोलाकार दगड दिसून आले असून, शास्त्रज्ञ सध्या त्यांच्या निर्मितीचा उलगडा करण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या ८ महिन्यांपासून क्युरिऑसिटी रोव्हर 'गेल क्रेटर'मधील माऊंट शार्पच्या उतारावर असलेल्या एकमेकांशी जोडलेल्या खडकाळ रांगांचा अभ्यास करत आहे. याला 'बॉक्सवर्क' असे नाव देण्यात आले आहे. सुमारे २० किलोमीटर परिसरात पसरलेल्या या रांगा अब्जावधी वर्षांपूर्वी मंगळाच्या पृष्ठभागाखालील भूजलामुळे तयार झाल्या असाव्यात, असा अंदाज आहे. २००६ मध्ये पहिल्यांदा उपग्रहाद्वारे या रांगा दिसल्या होत्या. मात्र, प्रथमच एखादे यान इतक्या जवळून त्यांचा अभ्यास करत आहे. शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे की, हे 'कोळिष्टक' म्हणजे मंगळावर दिसणारे प्रसिद्ध 'स्पायडर' नव्हेत. ते 'स्पायडर' कार्बन डायऑक्साईडचा बर्फ वितळल्यामुळे तयार होतात. याउलट, 'बॉक्सवर्क' हे खनिजांनी समृद्ध असलेल्या खडकांच्या एकमेकांना छेदणाऱ्या रांगा आहेत. नुकतेच 'नासा'ने प्रसिद्ध केलेल्या फोटोंमध्ये या संरचनेचे सूक्ष्म तपशील समोर आले आहेत. जमिनीपासून या रांगांची उंची ३ ते ६ फूट आहे. २१ ऑगस्ट रोजी काढलेल्या एका क्लोज-अप फोटोमध्ये या रांगांवर लहान, अनियमित आकाराचे ढेकूळ किंवा 'अंडी' सदृश गोलाकार भाग दिसून आले आहेत. असे भाग यापूर्वी कधीही पाहिले गेले नव्हते. परसेव्हरन्सशी संबंध हे गोलाकार भाग गेल्या वर्षी 'परसेव्हरन्स' रोव्हरला जेझेरो क्रेटरमध्ये आढळलेल्या रहस्यमय 'स्पायडर एग' दगडासारखेच दिसत आहेत. राईस युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञ टीना सीगर यांनी सांगितले की, 'हे गोलाकार भाग तिथेच का तयार झाले, याचे स्पष्टीकरण आमच्याकडे सध्या नाही.



# जगातील सर्वांत तरुण रहस्यमयी विवर

माईंड ब्लो

सॅटेलाईटद्वारे टिपलेल्या एका आश्चर्यकारक छायाचित्राने चीनमधील एका विस्तीर्ण विवराचे रहस्य जगासमोर आणले आहे. संशोधकांच्या मते, हे विवर पृथ्वीवरील अशा प्रकारच्या रचनांपैकी सर्वात 'तरुण' असून, गेल्या १ लाख वर्षांतील हा सर्वात मोठा 'इम्पॅक्ट क्रेटर' ठरण्याची शक्यता आहे. चीनच्या हेलॉन्गजियांग प्रांतातील लेसर झिंगान पर्वत रांगेत हे विवर स्थित आहे. याला 'येईलान विवर' असे नाव देण्यात आले असून, हे चीनमध्ये सापडलेले केवळ दुसरेच 'इम्पॅक्ट क्रेटर' आहे. हे विवर घोड्याच्या नालेसारखे अर्धवट वर्तुळाकार असून, याचा विस्तार १.१५ मैल (१.८५ कि.मी.) इतका आहे. विवराच्या भिंती जमिनीपासून सुमारे ५०० फूट (१५० मीटर) उंच आहेत. २०२१ मध्ये चिनी संशोधकांनी या विवराचा शोध लावला. त्यापूर्वी दाट जंगलामुळे ते जगाच्या नजरेतून सुटले होते. स्थानिक लोक याला 'क्वानशान' म्हणजेच 'गोलाकार पर्वतरांग' म्हणत असत. मात्र, जेव्हा शास्त्रज्ञांनी विवराच्या तळापासून १,४४० फूट खाली खोदकाम केले, तेव्हा त्यांना तिथे 'शॉक्ड क्वाट्र्ज', वितळलेले ग्रॅनाईट आणि काचेचे तुकडे सापडले. अवकाशातून एखादा मोठा खडक वेगाने आदळल्यानंतरच अशा प्रकारची चिन्हे निर्माण होतात. या शोधाने अमेरिकेतील ॲरिझोना येथील प्रसिद्ध 'बॅरिंजर क्रेटर'चा विक्रम धोक्यात आणला आहे. कार्बन डेटिंगनुसार, हे विवर ४६,००० ते ५३,००० वर्षांपूर्वी तयार झाले असावे.

STORY कथा

# कबुतर आणि संन्यासी

एकेकाळी, हिमालयातील एका गुहेत, रोमक नावाचा एक कबुतर राहत होता. तो सदाचारी आणि उदार होता, तो शेकडो कबुतरांचा राजा देखील होता. तसेच त्या डोंगराजवळ एका संन्यासीची झोपडी होती. रोमक अनेकदा त्या संन्यासीला भेटायला जायचा आणि त्याच्या प्रवचनांचा आनंद घ्यायचा. एके दिवशी, संन्यासी आपली झोपडी सोडून दुसरीकडे कुठेतरी गेला. काही दिवसांनी, एक व्यक्ती एका फसव्या संन्यासीच्या वेशात त्याच झोपडीत राहायला आला. हा माणूस धूर्त होता. एकदा, एका श्रीमंत गृहस्थांच्या घरी अन्न खाताना, तो मसालेदार कबुतराच्या मांसाने खूप मोहित झाला. त्याने स्वतःच्या झोपडीत जाऊन जवळच्या कबुतरांना पकडण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर, मसाले, स्टोव्ह आणि इतर वस्तू व्यवस्थित करून आणि त्याच्या कपड्यात एक मजबूत काठी लपवून, तो झोपडीच्या दारात कबुतरांची वाट पाहत उभा राहिला. लवकरच, त्याला रोमकच्या नेतृत्वाखाली अनेक कबुतर झोपडीवरून उडताना दिसले. त्याने त्यांना येण्याचे आमिष दाखवले. पण झोपडीतून येणाऱ्या मसाल्यांच्या सुगंधाने सावध झालेल्या हुशार रोमकने लगेच आपल्या मित्रांना पळून जाण्याचा आदेश दिला. कबुतरांना निसटताना पाहून त्याने रागाने रोमकवर मोठ्या ताकदीने आपली काठी फेकली, परंतु त्याचे लक्ष्य चुकले. मग रोमक ओरडला, 'अरे, दुष्टा! मी पळून गेलो आहे, पण तुला तुझ्या कृतींचे परिणाम भोगावे लागणार नाहीत. आता ही पवित्र झोपडी ताबडतोब सोडून कुठेतरी दूर जा, नाहीतर मी गावातील लोकांना तुझे रहस्य सांगेन.' रोमकचे जोरदार शब्द ऐकून ढोंगी ताबडतोब पळून गेला.

**तात्पर्य :** नेहमी चाणाक्ष राहावे कारण संकट सांगून येत नसते.

# ठायीं उपकरसी पांडवा

आस्था

**हातांचें करणें। कां पायांचें चालणें। तें होय मजकारणें। तैसें करीं।। आपुला अथवा परावा। ठायीं उपकरसी पांडवा। तेणें यज्ञें होईं बरवा। याज्ञिकु माझा।। हें एकैक शिकऊं काई। पैं सेवकें आपुल्या ठाईं। उरूनि येर सर्वही । मी सेव्यचि करीं ।।** हातांनी जी जी कृत्ये करशील किंवा पायाने जिकडे जाशील त्या सर्व क्रिया माझ्याच करिता कर. आपल्या किंवा दुसऱ्याच्या उपयोगी पडणाऱ्या ज्या ज्या क्रिया करशील, त्या अर्जुना, माझ्या ठिकाणी अर्पण करून माझा याज्ञिक हो. आता एक एक अशा किती गोष्टी शिकवूं! तर आपले ठिकाणी सेवकभाव मानून जे सर्वत्र तुला दृष्टीस पडेल, ते सर्व मद्रूप आहे असे समजून त्याची सेवा कर. मग प्राणिमात्राच्या ठिकाणचा द्वैतभाव नाहीसा होऊन सर्वत्र ठिकाणी मीच आहे, असे तुझ्या अनुभवास येऊन सर्वत्र नम्र होऊन वंदन कर. एवढ्याने माझा आश्रय तुला प्राप्त होईल. मग, सर्व जगात तिसरेपणा नाहीसा होऊन देवभक्ताचा एकांत झालेला पाहशील.

# मोटोरोला रेझर फोल्ड

LAUNCH पॅड



एमडब्ल्यूसी २०२६ मध्ये मोटोरोला रेझर फोल्ड लॉंच करण्यात आला आहे. मोटोरोला रेझर फोल्ड येत्या काही महिन्यांत लॅटिन अमेरिका, उत्तर अमेरिका, युरोप, मध्य पूर्व, आशिया पॅसिफिकमधील निवडक बाजारपेठांमध्ये उपलब्ध होऊ शकतो. युरोपमध्ये मोटो पेन अल्ट्रासोबत त्याची किंमत १,९९९ युरो (सुमारे २,१४,२०० रुपये) असेल. हा फोन पॅन्टोन ब्लॅकन्ड ब्लू आणि पॅंटोन लिली व्हाईट शेड्मध्ये लॉंच करण्यात आला आहे. ड्युअल सिम (फिजिकल सिम + ईसिम) मोटोरोला रेझर फोल्ड अँड्रॉइड १६-आधारित माय यूएक्सवर चालतो आणि त्यात ६.६-इंच (१,०८०x२,५२० पिक्सल) एलटीपीओ पोल्ड कव्हर डिस्प्ले आहे जो २१:९ आस्पेक्ट रेशो, १६५ Hz रिफ्रेश रेट आणि ६,००० nits च्या पीक ब्राइटनेससह आहे. डिस्प्लेमध्ये कॉर्निंग गोरिल्ला ग्लास सिरॅमिक ३ कोटिंग आहे. फोल्डेबलमध्ये २के रिझोल्यूशन, १२०Hz रिफ्रेश रेट, ६,२०० nits पर्यंत पीक ब्राइटनेस आणि अल्ट्रा थिन ग्लास (यूटीजी) प्रोटेक्शनसह ८.१-इंच इनर एलटीपीओ पोल्ड डिस्प्ले आहे. फोन स्नॅपड्रॅगन ८ जेन ५ चिपसेटसह एड्रेनो ए ८२९ जीपीयू, १६जीबीपर्यंत एलपीडीडीआर ५एक्स रॅम आणि १टीबी यूएफएस ४.१ स्टोरेजवर चालते. रॅम बूस्ट फीचरसह युजर्स १६ जीबी व्हर्च्युअल मेमरी जोडू शकतात. मोटोरोला फोनसाठी सात अँड्रॉइड ओएस अपग्रेड आणि सात वर्षांपर्यंत सुरक्षा अद्यतनांचे आश्वासन देत आहे.

# कॉफी पिण्याचे असेही फायदे



हेल्थ

काही लोकांना ऊर्जेसाठी चहा किंवा कॉफीची गरज असते. सकाळी उठल्याबरोबर लोकांना कॉफीची गरज भासू लागते. दिवसभर ऑफिसमध्ये काम करताना किंवा रात्री उशिरापर्यंत जागे राहून लोक कॉफीचे सेवन करतात. एरवी आरोग्याला काहीशी हानिकारक मानली गेली असली तरी कॉफीचे अनेक फायदे आहेत.

**निष्कर्ष काय सांगतो? :** काही अभ्यासांमध्ये असे आढळून आले आहे की कॉफीचे योग्य प्रमाणात सेवन केल्यास अनेक गंभीर आजारांमध्ये फायदे मिळू शकतात. कॉफी अनेक रोगांचा धोका कमी करण्यासाठीदेखील फायदेशीर ठरू शकते. कॉफीचे फायदे आणि हानी याबाबत अभ्यासात मिश्र परिणाम आढळले आहेत. निष्कर्ष असा आहे की योग्य प्रमाणात आणि योग्य वेळी कॉफीचे सेवन करणे फायदेशीर ठरू शकते आणि जास्त प्रमाणात सेवन करणे हानिकारक ठरू शकते.

**कॉफीमध्ये आढळणारे पोषक द्रव्य :** कॉफीमध्ये अनेक पोषक तत्त्वे मुबलक प्रमाणात आढळतात. रिबोफ्लेविन (व्हिटॅमिन बी २), नियासिन (व्हिटॅमिन बी ३), मॅग्नेशियम, पोटॅशियम, विविध फिनोलिक संयुगे आणि अँटीऑक्सिडंट्स कॉफीमध्ये असतात.

**टाईप-२ मधुमेहाचा धोका कमी ;** कॉफीच्या सेवनाने टाईप-2 मधुमेहाचा धोका कमी होऊ शकतो. २०१४ च्या अभ्यास अहवालानुसार, ४८,००० हून अधिक लोकांवर संशोधन करण्यात आले आणि असे आढळून आले की जे चार वर्षांमध्ये दररोज किमान एक कप कॉफी पितात त्यांना टाईप २ मधुमेहाचा धोका ११ टक्के कमी असतो. मात्र, मधुमेहाच्या रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच कॉफीचे सेवन करावे.

**चरबी कमी करण्यास मदत करते :** कॅफीन चयापचय दर ३-११ टक्क्यांनी वाढवू शकते.

# सतत झाडू मारण्याच्या सवयीमुळे आर्थिक अडचणी

वास्तू

महिलांना घरात जरा कचरा, घाण दिसली की लगेच झाडू मारण्याची सवय असते. वास्तुशास्त्रात झाडूशी संबंधित काही नियम सांगण्यात आले आहेत. कारण झाडूला देवी लक्ष्मीचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे झाडूचे हे नियम घरात पाळणे महत्त्वाचे आहे. सारखे घर झाडून घेणे अशुभ मानले जाते.



- शास्त्रांनुसार, झाडूमुळे घरातील नकारात्मक ऊर्जा निघून जाते. स्वच्छता म्हणजे लक्ष्मीचे आवडते स्थान. त्यामुळे झाडू हे लक्ष्मीचे रूप मानले जाते. यामुळेच कधीही झाडूवर पाय ठेवू नये, झाडूला कधीही जोरात आपटू नये किंवा फेकू नये आणि तो योग्य ठिकाणी ठेवावा असे म्हंटले जाते. झाडू चुकीच्या वापरामुळे घरात खूप अडचणी येतात.
- ज्योतिषशास्त्रानुसार, दिवसातून अनेक वेळा झाडू मारल्याने घराची स्थिर ऊर्जा असंतुलित होते. याचा परिणाम घरातील वातावरणावर होतो आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये संघर्ष वाढतो. शिवाय यामुळे घरात मानसिक ताण देखील वाढतो. विशेषतः जेवणानंतर, पूजेनंतर आणि कोणी घराबाहेर पडल्यानंतर लगेच झाडू मारणे अशुभ मानले जाते.
- सुर्यास्तानंतर झाडू मारणेही अशुभ असते.



चारोळी

सप्तरंगीं असे रंग,
इंद्रधनुष्याचे ते रूप...
सायंकाळ होते सांजवेळी,
नारंगी रंग होतसे खूप...

द्विशताब्दी महोत्सव



अहमदाबाद: अहमदाबादजवळील ऐतिहासिक जेतलपूर स्वामीनारायण मंदिराच्या २०० व्या वर्धापन दिनानिमित्त (द्विशताब्दी महोत्सव) ५ ते ११ मार्च २०२६ दरम्यान 'अक्षरनगर' येथे भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात जगभरातील १८ देशांतून लाखो भाविक सहभागी होणार असल्याची माहिती आहे.

## महत्वाचे...

# जिद्दी पुढे मैदान हरले

## कर्तुत्व सिद्ध करत खाकीचे दिशेने तृतीयपंथी उमेदवाराचे पाऊल

**नाशिक । प्रतिनिधी**



ज्या समाजात आजही तृतीय पंथीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन उपेक्षेचा आहे, तिथे नाशिक ग्रामीण पोलीस भरतीच्या मैदानात एका तृतीयपंथी उमेदवाराने आपल्या कर्तृत्वाने साऱ्यांची मने जिंकली आहेत. १६९२ पुरुष व महिला आणि तृतीयपंथी उमेदवारांच्या गर्दीत, या एका जिद्दीने मैदानी चाचणीत ५० पैकी तब्बल ३९ गुण पटकावून खाकी गणवेशाच्या दिशेने एक भक्कम पाऊल टाकले आहे. ही केवळ एक शारीरिक चाचणी नव्हती, शतकानुशतकांच्या सामाजिक बेड्या तोडून मुख्य प्रवाहात येण्यासाठी मारलेली एक उत्तुंग झेप आहे. तर नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या चालक पोलीस शिपाई पदासाठी झालेल्या या चाचणीत एकूण २ हजार ६७५ उमेदवारांना पाचारण करण्यात आले होते. त्यापैकी १ हजार ७५४ उमेदवार प्रत्यक्षात हजर झाले. यामध्ये महिलांसोबतच तृतीयपंथीयांनाही संधी देण्यात आली. शारीरिक मोजमापात ६२ उमेदवार अपात्र ठरले, तर १ हजार ५४० उमेदवारांनी मैदानी चाचणीचा टप्पा गाठला. या संपूर्ण प्रक्रियेत लक्ष वेधून घेतले ते एका तृतीयपंथी उमेदवाराने.

### ऐतिहासिक नोंद

नाशिकग्रामीणच्या इतिहासात चालक पोलीस शिपाई पदासाठी एका तृतीयपंथीयाने मैदानी चाचणी यशस्वीपणे पार करण्याची ही महत्त्वाची घटना आहे. शारीरिक मोजमापाच्या निकषात ६२ जण बाद झाले असताना, या उमेदवाराने सर्व तांत्रिक निकष पूर्ण केले महिलांच्या निकषाप्रमाणे ८०० मीटर धावण्याच्या आव्हानावर मात करत ३९ गुणांची कमाई केली.

या उमेदवाराने स्वतःची लिंग ओळख 'महिला/तृतीयपंथी' म्हणून निश्चित केल्यानंतर नियमानुसार ८०० मीटर धावण्याची चाचणी दिली. समाजाच्या टोमण्यांकडे दुर्लक्ष करत, पहाटेच्या दवबिंदूवर धावण्याचा सराव करत या उमेदवाराने मैदानी फेरीत ३९ गुण मिळवत 'अशक्य काहीच नाही' हे सिद्ध केले. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पडली.

**'३९' गुण.. सन्मानाची नवी सुरुवात!**

या एका उमेदवाराच्या ३९ गुणांनी नाशिकच्या पोलीस मैदानात धूळ उडवली असली, तरी त्याचे खरे पडसाद समाजाच्या मानसिकतेवर उमटणार आहेत. जेव्हा हा उमेदवार खाकी वर्दी परिधान करून रस्त्यावर उतरेल, तेव्हा तो केवळ एक 'पोलीस' नसेल, तर आपल्या समाजातील हजारो तृतीयपंथीयांसाठी एक 'आयडॉल' असेल.



## पालखेड बंधारा जीप प्राथमिक शाळेला सामाजिक अंकेक्षण ऑडिटर यांची भेट

### शाळेतील कामकाजाबाबत समाधान व्यक्त

**दिंडोरी । प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यात महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण पारदर्शकता सोसायटी मंत्रालय मुंबई यांच्यामार्फत जिल्हा परिषदेच्या शाळेचे सामाजिक अंकेक्षण चालू आहे.त्यामध्ये दिंडोरी तालुक्यातील सहाव्या टप्प्यात,३१ शाळांची निवड करण्यात आली होती. या ३१ शाळांमध्ये सामाजिक अंकेक्षण ऑडिटर यांनी दि.३ मार्च व ४ मार्च रोजी सहाव्या टप्प्यामध्ये महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण पारदर्शकता सोसायटी मंत्रालय मुंबई यांच्या अंतर्गत ऑडीटर राणी पवार विजया सोळसे यांनी दोन दिवसाच्या कालावधीमध्ये निवासी थांबून शाळेच्या कामकाजाबाबत ऑडिट केले. त्यामध्ये दैनंदिन कामाबरोबरच शालेय भौतिक सुविधा विविध अनुदाने गुणवत्ता दिव्यांग विद्यार्थी तसेच शालेय समिती अभिलेख हे आर्थिक सर्व बाबी शैक्षणिक साहित्य आणि विद्यार्थी गुणवत्ता शाळा व शालेय स्वच्छता मुला-मुलींचे स्वच्छतागृह पोषण आहार पिण्याची पाणी व शालेय उपक्रम शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेऊन चर्चा केली. यावेळी पवार व सोळसे यांनी सांगितले की या शाळे मध्ये बरेच वेगळेपण आम्हाला जाणवले याशिवाय शालेय समिती व शिक्षकवृंद यांच्यामध्ये असलेला एकोपा याविषयी समाधान व्यक्त केले व शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पुरवण्यात येणाऱ्या सुविधा बाबत समाधान व्यक्त केले. एवढ्या मोठ्या शाळेत अगदी थोड्या प्रमाणात त्रुटी आहे त्या नक्कीच शालेय समिती व शिक्षक वृंद भरून काढतील असा आशावाद त्यांनी व्यक्त करून शाळेची नवीन इमारतीची पाहणी करून होत समाधान व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या.उपस्थित मान्यवरांचा शालेय समिती व शिक्षकवृंद यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळीसामाजिककार्यकर्ते तथा शिक्षण तज्ञ बापू (तात्या) चव्हाण यांनी शाळेविषयी माहिती देऊन त्यांनी शाळेच्या विकासासाठी स्मार्ट बोर्ड कॉम्पुटर लॅब मदतीची मागणी केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण खैरनार यांनी केले. सूत्रसंचालन अमोल पवार यांनी केले तर आभार दिलीप झुरडे यांनी मानले. याप्रसंगी उपसरपंच बबलू गायकवाड शालेय समिती अध्यक्ष रामनाथ पीठे उपाध्यक्ष लहानु वाघ अन्वर सय्यद,धनराज महाले, अश्विनी चव्हाण,कविता कडाळे,मनीषा हेंद्रे आरती सोळशे,आदींसह गोविंद ढेपले,प्रशांत विसपुते,रवींद्र काकूळते,प्रदीप सावंत,प्रशांत उन्हवणे,ज्ञानेश्वर वायाळ वैशाली वाघेरे आदी उपस्थित होते.

# नाशिकमध्ये कुंभमेळ्याआधी 'कृषीकुंभ २०२६'

## एआय आणि ड्रोनचे थेट प्रात्यक्षिक

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी 'कृषीकुंभ २०२६' नाशिक जिल्हा कृषी महोत्सव व कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, कृषी विभाग, आत्मा आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (माविम) यांच्या संयुक्त विद्यमाने हा कृषी महोत्सव १२ ते १६ मार्च या कालावधीत नाशिकच्या पंचवटीतील हनुमान नगरजवळील युथ फेस्टिवल मैदानात आयोजित करण्यात आला आहे. जास्तीत जास्त शेतकरी बांधव, महिला शेतकरी, प्रयोगशील शेतकरी, कृषी उत्पादक कंपन्या यांनी महोत्सवास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी कृषीकुंभ २०२६ च्या आयोजनाबाबत तसेच या पाच दिवसीय प्रदर्शनात होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. 'कृषीकुंभ २०२६' बोधचिन्हाचे अनावरणही जिल्हाधिकारी प्रसाद यांनी केले. यंदाचा कृषीकुंभ केवळ प्रदर्शन नसून ते आधुनिक शेतीचे 'विद्यापीठ' ठरणार आहे. महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) शेतीतील वापर. केवळ चर्चा न करता, कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली एआय तंत्रज्ञानाचे थेट प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिले जाणार आहे.तसेच, शेतीची कामे सुलभकरणाऱ्या ड्रोन तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिकही पाहण्यास मिळणार आहे. प्रदर्शनात ४०० पेक्षा अधिक स्टॉल्स उभारले जाणार आहेत. यामध्ये बियाणे, खते, कीटकनाशके, यांत्रिकीकरण या पारंपरिक विषयांबरोबरच



नाविन्यपूर्ण दालने असतील. शेतकऱ्यांनी स्वतः विकसित केलेल्या नाविन्यपूर्ण अवजारांची स्पर्धा आणि प्रदर्शन. यासाठी शेतकऱ्यांना आपले तंत्रज्ञान घेऊन सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. प्रक्रिया उद्योजक, मशिनरी उत्पादक, बँका यांचे दालन आणि शासकीय योजनांसाठी अर्ज करण्याची सुविधा एकाच छताखाली उपलब्ध असतील. पर्यावरणपूरक शेतीसाठी बायोचार, १०-ड्रम थेरी आणि नैसर्गिक शेतीचे विशेष प्रारुप आणि प्रात्यक्षिक सुद्धा असणार आहे. कमी जागेत अधिक उत्पादनासाठी हायड्रोपोनिक्स आणि शेततळ्यातील मत्स्यपालनाचे प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षण. याशिवाय सोलर ड्रायर, पाणलोटचे प्रत्यक्ष मॉडेल, जलताराचे प्रत्यक्ष मॉडेल, मधमाशी पालन मॉडेल, ग्रेप कव्हर, फ्रुट कव्हर मॉडेल, आधुनिक कांदाचाळ, मशरूम, रेशीम, मोबाईल माती परीक्षण, हवामान केंद्रे, मुरघास, हनी पार्क इत्यादी प्रत्यक्ष पाहणी करता येणार आहे. सर्व प्रकारचे ट्रॅक्टर व ट्रॅक्टरचलीत नाविन्यपूर्ण यंत्रे पहावयास मिळतील. 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' निमित्त या महोत्सवात महिला शेतकऱ्यांच्या योगदानाचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. तसेच प्रयोगशील शेतकरी, शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना सन्मानित केले जाईल. १३ ते १५ मार्च रोजी दररोज दुपारी एक वाजता तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन व शेतीकरी बांधवांचा सन्मान होणार आहे. संध्याकाळच्या सत्रात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' (१४ मार्च) फेम कलाकारांचे कार्यक्रम आणि 'फोक लोक' (१५ मार्च) हा पारंपरिक लोककलेचा अविष्कार प्रेक्षकांचे मनोरंजन करेल. भेट देणाऱ्या नागरिकांसाठी नाशिक जिल्ह्यातील प्रसिद्ध खाद्यपदार्थांची 'खाऊ गल्ली' हे विशेष आकर्षण असेल. थेट शेतकऱ्यांकडून दर्जेदार धान्य खरेदी करण्यासाठी 'धान्य महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. 'कृषी कुंभ' सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत नागरिकांसाठी खुले असणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे

# इराण-इस्त्रायल युद्धाचा नाशिकला चटका

## खासदार वाजेंचे पीएमओला साकडे!

**नाशिक । प्रतिनिधी**

इराण आणि इस्त्रायल-अमेरिका आघाडीतील वाढत्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या युद्धजन्य तणावाचे पडसाद आता भारतासह महाराष्ट्रातही उमटण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी नाशिक जिल्ह्यातील नागरिकांची सुरक्षितता आणि कृषी निर्यातीवर होणाऱ्या परिणामांबाबत चिंता व्यक्त करत केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे. खासदार वाजे यांनी पंतप्रधान कार्यालय, परराष्ट्र मंत्रालय तसेच लोकसभेच्या



परराष्ट्र व्यवहार समितीला ई-मेल तसेच पत्राद्वारे सविस्तर निवेदन पाठवले असून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनाही स्वतंत्र पत्र लिहून या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. आखाती देशांतील जवळपास १४ देशांमध्ये हा संघर्ष सुरू आहे.

या ठिकाणी किमान एक कोटीहून अधिक भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. रोजगार, शिक्षण, व्यवसाय आणि इतर कारणांमुळे नाशिक जिल्ह्यातील मोठी संख्या या देशांत कार्यरत आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षिततेबाबत कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे वाजे यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. या संघर्षाचा परिणाम कृषी निर्यातीवर होण्याची शक्यता आहे. द्राक्षे, कांदा, डाळिंब, पपई, मनुका यांसारख्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीसाठी नाशिक जिल्हा देशातील महत्त्वाचे केंद्र मानले जाते. दर महिन्याला हजारो टन नाशवंत शेतमाल आखाती देशांकडे निर्यात होतो.

मात्र सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे समुद्री मार्गांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याने जवाहरलाल नेहरू बंदरावर (जेएनपीटी) येथे मोठ्या प्रमाणात कृषी माल अडकून पडला आहे. यामुळे शेतकरी व निर्यातदारांमध्ये अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार वाजे यांनी केंद्र सरकारकडे काही महत्त्वपूर्ण उपाययोजनांची मागणी केली आहे.त्यामध्ये आखाती देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेवर सातत्याने लक्ष ठेवणे, आवश्यकतेनुसार तातडीच्या सूचना व मदतवाहिनी सुरू करणे, परिस्थिती बिघडल्यास नागरिकांच्या सुरक्षित स्थलांतराची पूर्वतयारी तसेच कृषी निर्यात सुरळीत राहावी यासाठी शिपिंग व बंदर प्राधिकरणांशी समन्वय साधून शेतकरी व निर्यातदारांना दिलासा देणाऱ्या उपाययोजना राबविणे यांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनानेही केंद्र सरकारशी समन्वय साधत नाशिक जिल्ह्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी अपेक्षा त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात व्यक्त केली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे शेतकरी व निर्यातदारांवर मोठे संकट ओढावले असून यावर मार्ग काढावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### माल खराब होण्याची भीती

सध्या जवाहरलाल नेहरू बंदरावर दुबईकडे जाणारे १००० ते १५०० कंटेनर अडकले आहेत. यामध्ये १५० ते २०० हून अधिक कंटेनर एकट्या नाशिक जिल्ह्यातून निर्यात होणारे कांदे, द्राक्षे, पपई आदी नाशवंत शेतमालाचे आहेत. हा माल वेळेत पोहोचला नाही तर खराब होण्याची भीती असून त्यातून शेतकरी व निर्यातदार यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

## आखातातील युद्धाचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर आर्थिक प्रहार

**निफाड । प्रतिनिधी**

आखातातील युध्दामुळे कांदा उत्पादक पुन्हा आर्थिक संकटात सापडला आहे. राज्यातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव मोठ्या प्रमाणात घसरले असून शेतकऱ्यांच्या हातात उत्पादन खर्चही परत येत नसल्याची गंभीर स्थिती आहे. बाजारभावातून केवळ काढणी आणि वाहतूक खर्च भागतो; मात्र बियाणे, खत, औषधे, मजुरी, सिंचन, लागवडीवर मूळ खर्च पूर्णपणे बुडत आहे. यंदा अनुकूल हवामान, योग्य पेरणी कालावधी चांगल्या उत्पादनामुळे कांद्याचे विक्रमी उत्पादन झाले.

उत्पादन वाढ ही कृषी अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक बाब असते; मात्र भारतातील शेती व्यवस्थेतील मूलभूत विसंगती पुन्हा समोर आली. उत्पादन वाढल्यानंतर सरकारकडून बाजार स्थिरीकरणाची प्रभावी



यंत्रणा कार्यरत नसल्याने पुरवठा वाढताच भाव कोसळतात. यामुळे 'भरघोस उत्पादन म्हणजे आर्थिक नुकसान' ही शोकांतिका पुन्हा घडली आहे.

**खर्च आणि भावात तफावत**

कांदा उत्पादनासाठी प्रति क्विंटल उत्पादन खर्च १२०० ते १५०० रुपयांच्या घरात जातो; परंतु बाजारात मिळणारे दर अनेक ठिकाणी ७००-९०० रुपयांपर्यंतच मर्यादित असते, ही शेतकऱ्यांची प्रमुख तक्रार आहे. म्हणजे शेतकरी उत्पादन वाढवतो, पण प्रत्येक विक्रीत तोटा सहन करतो. ही परिस्थिती वैयक्तीक शेतकऱ्याला तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला कमकुवत करणारी आहे.

जागतिक बाजारपेठेत भारतीय कांद्याची मागणी कायम आहे. मध्यपूर्व देश, बांगलादेश, श्रीलंका आणि आग्नेय आशियातील अनेक देश भारतीय कांद्यावर अवलंबून असतात. यंदा उत्पादन घटलेले असतानाही भारताला निर्यात वाढवण्याची संधी होती.

मात्र देशांतर्गत दर नियंत्रणासाठी केंद्र सरकारने निर्यातबंदी, किमान निर्यात मूल्य, निर्यात शुल्क आकारल्याने या अस्थिर निर्णयांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय पुरवठ्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली.

परिणामी परदेशी आयातदारांनी इजिप्त, तुर्की किंवा इतर देशांकडे पर्याय शोधण्यास सुरुवात केली. निर्यात मर्यादित झाली देशांतर्गत बाजारात माल साचला म्हणूनच भाव कोसळणे अपरिहार्य ठरले. कांद्याचे दर वाढल्यानंतर तातडीने हस्तक्षेप करणारे शासनाकडून दर घसरले की शेतकऱ्यांसाठी तितक्याच वेगाने उपाययोजना होताना दिसत नाहीत. अशातच आता युध्दाचा परिणाम झाला आहे. इराण इस्त्राईल युध्दामुळे समुद्रमार्गे वाहातूक ठप्प झाल्याने त्याचा परिणाम झाला.

### दीर्घकालीन उपायांची गरज

सध्याची परिस्थिती लक्षात घेता काही मूलभूत सुधारणा अपरिहार्य ठरतात. कांद्यासाठी किंमत स्थिरीकरण निधी गरजेचा आहे. राज्यात कांदा हा फक्त पिक नाही; तो लाखो शेतकरी कुटुंबांच्या अर्थकारणाचा आधार आहे. कांद्याचे भाव पडले की कर्जफेड थांबते, खरेदी कमी होते, ग्रामीण बाजारपेठ मंदावते आणि त्याचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. उत्पादन वाढवूनही जर तोटा होत असेल, तर शेती टिकणार कशी.

# धक्कादायक : कुंभमेळा कामांमुळे नाशिककरांचे आरोग्य धोक्यात; विधानसभेत प्रशासनाचा झाला 'पंचनामा'!

**नाशिक । प्रतिनिधी**

कुंभमेळ्यानिमित्त एकाच वेळी हाती घेतलेली प्रमुख २८ रस्त्यांची कामे आणि या ठिकाणी गॅस, वीज, पाणी पुरवठा वाहिन्या, ऑप्टिकल फायबर, गटार, पावसाळी पाणी वाहून नेण्याची व्यवस्था आदींसाठी चाललेली खोदकामे यामुळे संपूर्ण शहरात धुळधाण उडाली आहे. सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता विधानसभा अधिवेशनात व्यक्त करण्यात आली. या स्थितीला प्रशासनाचा असमन्वय, उपाय योजनांचा



अभाव जबाबदार असल्याचा ठपका लोकप्रतिनिधींकडून ठेवला गेला.

कुंभमेळ्यानिमित्त रस्त्यांसह अन्य कामांमुळे ठिकठिकाणी खोदकाम होत आहे. त्यासाठी वाहतूक मार्गात मोठे फेरबदल केले गेले. खोदलेले रस्ते माती, मुरूम टाकून तात्पुरते भरले जातात. परिणामी धुळ, खड्ड्यांबरोबर वाहतूक कोंडीला नाशिककरांना सामोरे जावे लागत आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली की. परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना एक, दीड तास आधी घराबाहेर पडण्याचे आवाहन खुद्द पोलिसांना करावे लागले. धुळीमुळे नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, भाजपच्या आमदार देवयानी फरांदे यांनी विधानसभेत लक्षवेधी मांडून मनपा प्रशासनाच्या कारभारावर ताशेरे ओढले.

अधिवेशनात नाशिकच्या रस्त्यांवरील खड्डे, धूळ प्रदूषण आणि यंत्रणांमधील असमन्वय यामुळे नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होत असल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. मनपा प्रशासनाचे कामकाज पूर्णतः दिशाहीन झाले आहे. विकास कामांमध्ये कोणताही समन्वय नसल्याचे आमदार फरांदे यांनी नमूद केले.

एमएनजीएल कंपनीकडून गॅस वाहिनी टाकण्यासाठी वारंवार रस्ते खोदले जातात. या कामांसाठी मनपा नाहरकत दाखला देत असून प्रत्येक कामासाठी वेगवेगळ्या ठिकाणी रस्ते खोदले जात असल्याने शहराची दुरवस्था झाली आहे. रस्ते खोदण्याची परवानगी देताना दुरुस्तीसाठी रक्कम भरून घेतली जाते.

या रकमेचा वापर दुरुस्तीसाठी न करता भलत्याच कारणासाठी केला जातो. परिणामी शहर खड्डेमय झाले असून अनेक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे फरांदे यांनी अधोरेखित केले.

### मनपा प्रशासन दिशाहीन

कुंभमेळ्यासाठी चाललेल्या कामांमुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणावर धूळ पसरत आहे. त्यावर नियंत्रणासाठी कोणतीही प्रभावी उपाययोजना मनपाने केलेली नसल्याची टीका आमदार फरांदे यांनी केली. इमारतींच्या पुनर्विकास कामात सुरक्षा नियमांचे उल्लंघन होत असून बांधकामस्थळी संरक्षक जाळी न लावता कामे केली जातात. बांधकामासाठी जाणाऱ्या वाहनांमधून साहित्य रस्त्यावर पडून धुळीत भर पडते. धुळीमुळे अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. या परिस्थितीने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. श्वसनासंबंधी आजार वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. महापालिकेसह संबंधित यंत्रणांकडून याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप फरांदे यांनी केला. शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून महापालिकेला रस्ते दुरुस्ती, धूळप्रदूषण व बांधकाम सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे यासाठी निर्देश देण्याची मागणी फरांदे यांनी केली.